अग्रलेखांचा बादशहा नवाकाळ

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवाकाळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

# हे विभाजन विकासाचे आश्वासन हवे

महाराष्ट्राच्या राजकीय आणि प्रशासकीय इतिहासामध्ये एका नव्या घटनेची नोंद झाली आहे. राज्यात असलेल्या एकूण जिल्ह्यांच्या संख्येत आता आणखी एकाने वाढ झाली असून पालघर हा नवा जिल्हा अस्तित्वात आला आहे. जवळपास १९८९ पासून ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाचे भिजत घोंगडे पडले होते.त्यावेळी मुख्यमंत्री असलेल्या शरद पवारांनी सर्वप्रथम ठाणे जिल्ह्याच्या विभाजनाची घोषणा केली होती. परंतु पुढे काहीच झाले नाही. फक्त एक समिती नेमून चालढकल केली होती. महाराष्ट्रात गेल्या पंधरा वर्षांमध्ये नव्याने पाच ते सहा जिल्हे अस्तित्वात आले.परंतु आकाराने सर्वात मोठ्या असलेल्या ठाणे जिल्ह्याचे विभाजन केवळ राजकीय हमरीतुमरीमुळे लांबले होते.ज्यावेळेला महाराष्ट्र राज्य १९६० साली अस्तित्वात आले त्यावेळेला २६ जिल्हे होते.आज २०१४ साली त्याची संख्या छत्तीस झाली आहे. यापूर्वी धुळे जिल्ह्याचे विभाजन करून नंदुरबार हा नवा जिल्हा अस्तित्वात आला होता. प्रामुख्याने धुळे जिल्ह्यातील आदिवासी भागातल्या लोकांची अडचण त्यामुळे कमी झाली होती आतादेखील पालघर, डहाणू, वाडा या भागांतल्या म्हणजेच ठाण्यापासून किमान पन्नास किलोमीटर लांब राहणाऱ्या लोकांची या नव्या जिल्ह्यामुळे सोय होणार आहे. खरे तर हा जिल्हा किमान दहा वर्षांपूर्वीच अस्तित्वात यायला हवा होता.पण उशिरा का होईना सरकारने पालघर परिसरातल्या लाखो नागरिकांच्या मागणीला न्याय दिलेला आहे. विशेषत: कोणत्याही परिसराचा विकास करायचा असेल तर शासकीय कामे वेगाने सुरू होणे गरजेचे असते. त्यासाठी जाणारा वेळ हा एकूणच प्रगतीतला मोठा अडसर असतो. जिल्हाधिकारी कार्यालय म्हटल्यानंतर अनेक गोष्टींचे परवाने किंवा मान्यता तिथून मिळवावी लागते. छोट्या-छोट्या प्रकल्पांसाठी किंवा कारखान्यांसाठी भूसंपादनाच्या आणि इतर सोयीसुविधांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये यावे लागते. एवढेच नव्हे तर जिल्हा नियोजनाचे अनेक निर्णय तिथूनच होत असतात. सर्व परिसराला किंवा भागाला योग्य तो न्याय मिळवायचा असेल किंवा जिल्ह्याचासुध्दा समतोल विकास साधायचा असेल तर या शासकीय कचेऱ्यांचे किंवा कामाचे जास्तीत जास्त विकेंद्रीकरण झाले पाहिजे.ठाणे जिल्ह्याचे या पध्दतीने विकेंद्रीकरणच झालेले नव्हते. दूरच्या आदिवासी पाड्यातला एखादा विषय जरी असेल तरी त्यासाठी ठाण्याला येणे भाग पडत होते.त्यात प्रवासामध्ये जाणारा वेळ आणि शक्ती आता वाचू शकेल. हे विभाजन केवळ शासकीय सोयीसाठी न राहता ते त्या परिसराच्या विकासाचे आश्वासन ठरले पाहिजे.

### राजकीय उद्देश नसावा

अनेकांना या गोष्टींचेदेखील आश्चर्य वाटू शकते. की, दोन महिन्यांवर महाराष्ट्राच्या निवडणुका येऊन ठेपल्या असताना जाता जाता आघाडी सरकारने त्या विभाजनाची एवढी वेगवान आघाडी का उभारली. कदाचित त्यामागे काँग्रेस आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांचा थोडाफार राजकीय स्वार्थ असू शकतो.परंतु तसे पाहिले तर एकूणच आपल्या देशात अनेक निर्णय हे राजकीय हेतूनच होत असतात. मतपेट्या किंवा एकगठ्ठा मते डोळ्यासमोर ठेवून निर्णय घेतले जातात, काहीवेळेला तर लादलेही जातात. मुंबईसारख्या राजधानीचे शहर असलेल्या ठाणे जिल्ह्याचा विकास हा अत्यंत महत्त्वाचा ठरतो. कारण आज मुंबईत जागा शिल्लक राहिलेली नाही. घरांच्या किंमती किंवा जागांच्या किंमती सामान्य माणसाच्या आवाक्याच्या बाहेर गेल्या आहेत. मुंबईत एखादा मोकळा भूखंड सापडणे म्हणजे लॉटरी लागण्यासारखे ठरते. त्यासाठी मोजली जाणारी कोट्यवधींची रक्कम पाहता मुंबईच्या विकासाला काही प्रमाणात मर्यादा पडत आहेत. आता ठाणे, रायगड या जिल्ह्यांचा नियोजनपूर्वक विकास केला तर मुंबईवरचा ताण त्यातून कमी होऊ शकतो.या दृष्टिकोनातून पंचवीस वर्षांपूर्वी नवी मुंबई अस्तित्वात आणली गेली. आता रायगड जिल्ह्यात आंतरराष्ट्रीय विमानतळ अस्तित्वात येत आहे. या परिसराला तिसरी मुंबई म्हणून विकसित करण्याचा शासनाचा विचार दिसतो.पनवेलपर्यंत जोडल्या गेलेल्या उपनगरीय रेल्वे गाड्या मुंबईतली गर्दी कमी करणाऱ्या ठरल्या एवढेच नव्हे तर सामान्य नोकरदार माणसाला मुंबईत घर घेणे अजिबात परवडत नाही अशासाठी पनवेल, रायगड या ठिकाणी परवडणारी घरे उपलब्ध झाली अगदी तसाच प्रकार या नव्या पालघर जिल्ह्याबाबत होऊ शकतो. कारण आज विरारपर्यंत प्रचंड गर्दीने वस्ती झालेली आहे.पालघर डहाणू या भागातील जागा नियोजनपूर्वक सिडको किंवा एमएमआरडीएकडून विकसित केल्या गेल्या. पण त्याचासुध्दा नागरिकांना लाभ होईल आणि मुंबईवरचा ताणही हलका होईल.म्हणूनच मुंबईला लागून असलेला हा जिल्हा यापूर्वीच अस्तित्वात यायला हवा होता.आता तो घोषित करताना त्याच्या नियोजनाचे किंवा विकासाचे धोरण अतिशय काळजीपूर्वक राबवले गेले पाहिजे.कारण अजूनही या परिसरात जागांच्या किंमती प्रचंड प्रमाणात वाढलेल्या नाहीत.आता मात्र पालघर जिल्हा झाल्यामुळे त्या वाढू शकतात नवे प्रकल्प तिथे येऊ शकतात आणि रोजगाराच्या संधीही तिथे निर्माण होऊ शकतात.

### महापालिकांचीही निर्मिती

दुर्दैवाने आपल्याकडे जिल्हा किंवा महापालिकांची निर्मिती करताना हवी तेवढी दक्षता दाखवली जात नाही.केवळ एक राजकीय हत्यार किंवा नागरिकांवर ज्यादा कर लादून पैसे गोळा करण्याचे नवे माध्यम म्हणूनही या गोष्टींकडे पाहिले जाते.नव्या जिल्ह्यांची निर्मिती होत असताना महाराष्ट्रात तितक्याच नव्या महापालिकाही अस्तित्वात आल्या; परंतु या महापालिकेमुळे लोकांना ज्या पध्दतीने लाभ व्हायला हवा होता तो दिसतच नाही.उलट अनेक खेडी किंवा गावे त्या शहरांना जोडली जातात आणि मग पाणीपुरवठ्यापासून ते जागांच्या किंमतींपर्यंत अनेक गोष्टी महाग होत जातात. उलट जिल्हा किंवा महापालिकांची निर्मिती करताना सामान्य माणसाला दिलासा मिळाला पाहिजे.त्याच्या खिशावर पडणारा ताण कमी झाला पाहिजे. मात्र आतापर्यंतच्या अनुभवातून नवे जिल्हे, नव्या महापालिका म्हणजे आणखी नवे किंवा वाढीव कर असे चित्र पाहायला मिळते.पालघर जिल्ह्याची निर्मिती करताना या त्रुटी किंवा दोषांवर लक्ष केंद्रित केले पाहिजे. म्हणूनच आम्ही म्हटल्याप्रमाणे हे केवळ प्रशासकीय किंवा राजकीय स्वरूपाचे विभाजन ठरू नये ते सामान्य माणसाला लाभ मिळवून देणाऱ्या विकासाचे आश्वासन झाले पाहिजे.